| | | | | |
|---|---|---|---|---|
| MHNS130000552023 | दाखल तारीखः | ०६/०१/२०२३ | | |
| | नोंदणी तारीखः | ०६/०१/२०२३ | | |
| | निकाल तारीखः | ०९/०४/२०२६ | | |
| | **कालावधीः** | **वर्ष** ०३ | **महिने** ०३ | **दिवस** ०३ |

**पिंपळगांव (ब.) येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्री.ए. जे. पाटील)

**नियमित दिवाणी दावा क्र.१२/२०२३** **निशाणी क्र.२९**

बँक ऑफ महाराष्ट्र, राष्ट्रीयकृत बँक, मुख्य कार्यालय लोकमंगल १५०१,
शिवाजीनगर, पुणे यांची एक शाखाः
रानवड, ता.निफाड, जि.नाशिक, तर्फे शाखाधिकारी
श्री.संतोष रमेश सोनवणे, वय ३३ वर्षे, व्यवसायः– नोकरी,
रा.रानवड, ता.निफाड, जि.नाशिक. **वादी...**

**विरुध्द**

१) श्री. वामन सिताराम साळवे, वयः ७० वर्षे, व्यवसायः शेती,
२) श्री. श्रीकांत चंद्रकांत चव्हाण, वयः४३ वर्षे, व्यवसायः शेती,
३) श्री. ज्ञानेश्वर निवृत्ती चव्हाण, वयः ४८ वर्षे, व्यवसायः शेती,
सर्व रा. रेडगांव बु., ता.निफाड, जि.नाशिक. **प्रतिवादी...**

*****************************************************

| |
|---|
| वादीतर्फे विद्वान विधीज्ञः– श्री.स्वप्नील रमेश ठाकरे |
| प्रतिवादींतर्फेः– एकतर्फा |

*****************************************************

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०९ एप्रिल, २०२६)

सदरचा दावा हा कर्ज रक्कमेच्या वसुलीकरीता दाखल केला आहे.

०२) वादीचे असे कथन आहे की,

वादी बँक ऑफ महाराष्ट्र ही राष्ट्रीयकृत बँक आहे. वादी बँकेची एक शाखा रानवड, ता.निफाड, जि.नाशिक या ठिकाणी आहे. वादी बँक बँकेच्या नियमानुसार त्यांचे खातेदारांना त्यांचे गरजेनुसार व मागणीनुसार निरनिराळे कारणास्तव कर्जाच्या पुरवठा करीत असते. प्रतिवादी क्र.१ हे वादी बँकेचे खातेदार असून त्यांचा शेतीचा व्यवसाय आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ला द्राक्षबागेचे आधारासाठी लोखंडी खांब व तारांचा सांगाडा व ठिबक सिंचन करण्यासाठी मध्यमुदत कर्जाची आवश्यकता होती. प्रतिवादी क्र.१ने वादी बँकेकडे दि.२६/१२/२०१४ रोजी कर्ज मागणीसाठी अर्ज केला. सदरच्या कर्जास प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी जामीनदार राहण्याचे कबुल केले. त्यामुळे वादी बँकेने अटी व शर्तीवर प्रतिवादी क्र.१ यांना दि.०२/०२/२०१५ रोजी अटी व शर्तींचे पत्र प्रतिवादींना देवुन रक्कम रुपये १,७०,०००/– इतके मध्यमुदत कर्ज मंजुर केले. प्रतिवादींनी वादीचे लाभात कर्जासाठी खालीलप्रमाणे कागदपत्र लिहुन व सही व अंगठे करुन दिले.

| | | |
|---|---|---|
| १ | कर्ज मागणी अर्ज | ०२/०२/२०१५ |
| २ | कर्ज मंजुरी पत्र | ०२/०२/२०१५ |
| ३ | डिमांड प्रॉमिसरी नोट रक्कम रु.१,७०,०००/– | ०२/०२/२०१५ |
| ४ | गहाणकरारनामा | ०२/०२/२०१५ |
| ५ | वचनचिठ्ठी | ०२/०२/२०१५ |
| ६ | कर्ज करारपत्र | ०२/०२/२०१५ |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रतिज्ञापत्र | ३१/१२/२०१४ |
| ८ | डिक्लेरेशन चार्ज अनुसुची कलम ५ चे प्रतिज्ञापत्र | ३१/१२/२०१४ |

**०३)** या प्रमाणेचे दस्तऐवज प्रतिवादींनी वादीच्या लाभात लिहुन देवुन प्रतिवादी क्र.१ ने त्यांच्या मालकीच्या मौजे रेडगांव बु., ता.निफाड, जि.नाशिक येथील गट नं.४० या मिळकतीवर वादी बँकेचे वरील एकुण कर्जाचा बोजा निर्माण केला व कर्ज रकमेचा बोजा मिळकतीच्या इतर अधिकारात दाखल केला.

**०४)** सदरचे मध्यमुदत कर्जावर द.सा.द.शे.११.७५% इतके व्याज देण्याचे ठरलेले होते. सदरचे व्याज नियमितपणे न दिल्यास द.सा.द.शे.२% दराचे दंडव्याज देण्याची देखील प्रतिवादींनी मान्य व कबुल केले. सदर कर्जाची परतफेड दि.३०/०६/२०१६ रोजी पासुन सुरु झाली व प्रत्येक वर्षी रक्कम रुपये २५,००००/- + व्याज अशी एकुण ७ वर्षात परतफेड करावयाची होती. परंतु प्रतिवादींनी कधीही ठरल्याप्रमाणे कर्जाची व व्याजाची रक्कमेची परतफेड केली नाही. त्यांना वेळोवेळी तोंडी व लेखी सुचना देवुन कर्जाची परतफेड करणेबाबत कळविले. त्यांनी कर्ज मंजुरीच्या अटी व शर्तींचा पुर्णपणे भंग केला. त्यामुळे प्रतिवादी हे वादी बँकेचे थकबाकीदार झाले. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी सदर कर्जाची व्याजासह परतफेडीची जबाबदारी जामीनदार म्हणून स्विकारलेली होती. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी बँकेचे कर्जाची परतफेड करण्यास वैयक्तिक व संयुक्तीकरित्या जबाबदार आहे.

**०५)** प्रतिवादी क्र.१ चे कर्ज खाते दि.०३/०५/२०२२ रोजी पासुन एन.पी.ए. झाले. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी बँकेस कर्ज प्रकरणी दिलेला वसुल वजा जाता प्रतिवादींकडे वादी बँकेची खालीलप्रमाणे रक्कम घेणे बाकी आहे.

| कर्ज प्रकार | दि.०३/०५/२०२२ रोजी पर्यंतची थकीत रक्कम | खाते एन.पी.ए. झालेपासुन ते दि.२६/०७/२०२२ रोजी पावेतो न आकारलेले व्याज | दंड व्याज इतर | दि.२६/०७/२०२२ रोजी अखेर येणे असलेली एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| मध्यमुदत कर्ज | १,१२,४६७.९०/- | ३०,५००/- | २,३०८/- | १,४५,२७५.९०/- |

०६) तसेच दि.२७/०७/२०२२ रोजी पासुनचे पुढील व्याज इतकी रक्क्म घेणे बाकी आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना दि.२५/०८/२०२२ रोजी नोटीस पाठवुन वरील रक्कम बँकेत भरणेबाबत कळविले. प्रतिवादी क्र.१ व ३ दि.३०/०८/२०२२ रोजी नोटीस मिळुनही त्यांनी रक्कम जमा केली नाही. प्रतिवादी क्र.२ यांना दि.०१/०९/२०२२ रोजी नोटीस मिळुनही त्यांनी नोटीस घेण्यास नकार दिला. त्यामुळे सदरची रक्कम व या दाव्याचा खर्च वसुल करुन मिळणेसाठी वादीने प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा दाखल केला.

०७) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना समन्सची बजावणी झाल्याचा अहवाल (निशाणी ६) कडे प्राप्त झाला. परंतु प्रतिवादी हे दाव्यामध्ये हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा दावा चालविण्यात आला.

०८) वादीकरीता विद्वान विधीज्ञ श्री. स्वप्नील रमेश ठाकरे यांचा युक्तीवाद ऐकला.

०९) याकामी मी वादमुद्दे व त्यावरील माझे कारणांसह निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र.१ ने वादीकडून मध्यमुदत कर्ज रक्कम | |

| | | |
|---|---|---|
| | रु.१,७०,०००/– घेतल्याचे वादीने सिध्द केले काय ? | **होय.** |
| २ | प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ याच्या कर्ज फेडीकरीता जामीनदार असल्याचे वादीने सिध्द केले काय ? | **होय.** |
| ३ | वादी हे प्रतिवादीकडून कर्जाची रक्कम रु.१,४५,२७५.९०/–व दि.२७/०७/२०२२ रोजी पासुनचे पुढील व्याज वसुल करण्यास पात्र आहे काय ? | **होय.** |
| ४ | अंतिम आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीताः–</u>**

**१०)** वरील तिनही मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असुन त्यावरील पुरावा देखील सारखाच आहे. त्यामुळे ते एकत्रीत चर्चेसाठी घेण्यात आले आहेत.

**११)** वादी बँकेने शाखाधिकारी चेतन दत्ताराम मोरे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी ७) दाखल केले. त्यांच्या पुराव्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ चे मध्यमुदत कर्ज खाते क्र.६०२०२९५०१८३ आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ ला दि.०२/०२/२०१५ रोजी द्राक्षबागेसाठी रक्कम रु.१,७०,०००/– मध्यमुदत कर्ज मंजुर केले होते. प्रतिवादी क्र.१ ने वादीच्या लाभात खालील कागदपत्रे लिहुन दिले आहेत–

*कर्ज मागणी अर्ज (निशाणी ८), कर्ज मंजुर पत्र (निशाणी १०), वचन चिठ्ठी (निशाणी ११), तारण करारनामा (निशाणी १२), हमीपत्र (निशाणी १३), करारपत्र (निशाणी १४), प्रतिज्ञापत्र (निशाणी १५) व (निशाणी १६), पुष्टीपत्र (निशाणी १७ ते २०) खाते उतारा (निशाणी २१).*

**१२)** वादीकरीता विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी त्यांचा दावा कागदोपत्री पुराव्यावरुन शाबीत केला आहे. प्रतिवादी यांनी या प्रकरणी हजर होवून दाव्यास विरोध केला नाही. या प्रकरणी प्रतिवादी क्र.१ ने मध्यमुदत कर्ज घेतल्याचे कागदोपत्री पुराव्यावरुन शाबीत झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार असल्याचे देखील शाबीत झाले आहे. वादीने प्रतिवादी क्र.१ च्या कर्जाचा खातेउतारा शाबीत केला आहे. त्यामुळे दावा मंजुर होण्यास पात्र आहे.

**विश्लेषणः**

**१३)** सदर प्रकरणात वादीने दाखल केलेले कागदपत्रांचे अस्तित्व व निष्पादन प्रतिवादींनी हजर होवून नाकारलेले नाही.

**१४)** वचनचिठ्ठी (निशाणी ११) नुसार प्रतिवादी क्र.१ ने वादीस रक्कम रु.१,७०,०००/-, त्यावर ११.७५% द.सा.द.शे. व्याज हे पुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत तसेच त्यावरील दंड व्याज देण्याचे कबुल केले आहे. तसेच तारण करारनामा (निशाणी १२) नुसार प्रतिवादी क्र.१ ने वादीस रक्कम रु.१,७०,०००/- लाखाच्या कर्जाच्या परतफेडीकरीता प्रतिवादी क्र.१ च्या शेतीमधील साधने तसेच स्थावर वस्तु या गहाण दिले आहे. हमीपत्र (निशाणी १३) नुसार प्रतिवादी क्र.२ व ३ ने प्रतिवादी क्र.१ च्या मुदतकर्ज रक्कम रु.१,७०,०००/- यास हमी दिल्याचे दिसून येते.

**१५)** मुदतकर्ज करार (निशाणी १४) नुसार प्रतिवादी क्र.१ ने वादीस मुदतकर्ज रक्कम रु.१,००,०००/- व्याजासह परतफेड करण्याचा करार केल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.१ ने दि.३१/०३/२०२३ रोजी रक्कम

रु.१,३०,५५८/– वादीस देणे लागत असल्याबाबत पुष्टी प्रमाणपत्र (निशाणी २०) दिल्याचे दिसून येते.

**१६)** वादीचा तोंडी पुरावा व कागदोपत्री पुरावा यावरुन प्रतिवादी क्र.१ ने रक्कम रु.१,००,०००/– हे वादीकडून कर्ज म्हणून घेतल्याचे व ते कर्ज व्याजासह फेडण्याचे कबुल केल्याचे शाबीत होते.

**१७)** खाते उतारा (निशाणी २१) नुसार मुद्दल, व्याज व दंड या सर्वांचा दि.२६/०७/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ कडे रक्कम रु.१,४५,२७५.९०/– थकीत असल्याचे दिसून येते. पुष्टीपत्र (निशाणी १७ ते २०) नुसार प्रतिवादी क्र.१ ने दि.२९/०१/२०१८, २९/०१/२०१८, ११/०१/२०२१ व ११/०१/२०२१ रोजी पर्यंतची वादीस देणे रक्कम असल्याचे कबुल केले आहे. नोटीस (निशाणी २२) व पोष्टाची पावती निशाणी २३ नुसार दि.२७/०७/२०२२ रोजीपर्यंत व्याजासह होणारी एकुण रक्कम रु.१,४५,२७५.९०/– व त्यावरील पुढील व्याज याची मागणी दि.२५/०८/२०२२ रोजी वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना केल्याचे दिसून येते.

**१८)** प्रतिवादी क्र.२ व ३ हे प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार असल्याचे हमीपत्र (निशाणी १३) यावरुन शाबीत होते. सबब, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा रक्कम देण्यास सामुहीक व स्वतंत्रपणे जबाबदार आहेत. त्यामुळे वादी हे प्रतिवादींकडून दावा रक्कम वसुल करण्यास पात्र आहेत. त्याप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी दिले आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः–</u>**

१९) दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३४ प्रमाणे रक्कम वसुली करीता हुकुमनामा पारित करतांना दावा दाखल तारखेपासुन ते हुकुमनामा तारखेपर्यंत ठरविण्यात आलेल्या मुद्दल रक्कमेवर व्याज देता येते. तसेच हुकुमनाम्यानंतर ते रक्कम वसुल होईपर्यंत व्याज देखील देता येते. वाणिज्य व्यवहारामध्ये कराराप्रमाणे भविष्यातील व्याजदर देता येते. येथे प्रतिवादीचा व्यवसाय हा शेतीचा असल्याचे वादीचे कथन आहे. त्यामुळे तो वाणिज्य व्यवहार म्हणता येणार नाही. वादीने प्रतिवादीस उधारीवर माल विक्री केला होता. सबब, दावा दाखल तारखेपासुन ते पुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे.६% दराने व्याज आकाराने योग्य राहिल. सबब, मी मुद्दा क्र.४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | दावा खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वादी बँकेस व्यक्तीशः व संयुक्तिकरित्या रक्कम रुपये १,४५,२७५.९०/– अदा करावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना पुढे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वरील रक्कमेवर दावा दाखल तारखेपासुन ते पुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे.६% दराने व्याज दयावे. |
| ४. | येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा. |

**सही/–**

पिंपळगांव ब. **(ए. जे. पाटील)**

दि.०९/०४/२०२६. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

पिंपळगांव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS